International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.5 No. 18 May-June 2024

# अहिल्याबाई होळकरांचे पर्यावरण क्षेत्रातील योगदान

**डॉ. योगेश यादवरावजी किनकर**
**Email**:yogeshkinkar11@gmail.com
इतिहास विभाग
अरविंदबाबू देशमुख महाविद्यालय भारशिंगी ता.नरखेड जि.नागपूर
**Corresponding Author - डॉ. योगेश यादवरावजी किनकर**
**DOI- 10.5281/zenodo.11655269**

**प्रस्तावना:-**

मराठा कालखंडात जिजाबाई, येसूबाई, ताराबाई, राधाबाई, गोपिकाबाई, उमाबाई, अनुबाई, गौतमाबाई अशा कर्तबगार स्त्रियांनी प्रजेसाठी महत्त्वपूर्ण कामगिरी केली व इतिहासात आपले स्थान पक्के केले. याच कालखंडात भारताच्या इतिहासात ज्या कर्तुत्वशालिनी स्त्रिया होऊन गेल्या त्यात इंदोर संस्थानाच्या राणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. अहिल्याबाई चा जन्म महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात सीना नदीच्या काठी वसलेल्या चोंडी या गावात वैशाख कृष्ण सप्तमी सोमवार 31 मे 1725 रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव माणकोजी शिंदे व आईचे नाव सुशिलाबाई होते. माणकोजी हे चोंडी गावचे पाटील होते. अहिल्याबाई चे आई वडील दोघेही धार्मिक वृत्तीचे होते. त्यांनी अतिशय चांगले संस्कार करून अहिल्याबाईला वाढविले. अहिल्याबाई चे शिक्षण पाच भावंडांच्या सहवासात घरीच झाले, माळव्यातील इंदोर संस्थानाचे संस्थापक मल्हारराव होळकर या मराठेशाहितील मातब्बर सरदाराचा पुत्र खंडूजी उर्फ खंडेरावाशी वयाच्या आठव्या वर्षी इ.स. 1733 मध्ये अहिल्याबाई चा विवाह होळकरांच्या साजेशा रीतीने थाटामाटात संपन्न झाला. विवाह नंतर सासरी अहिल्याबाईला सर्व प्रकारचे शिक्षण देण्याचा प्रयत्न मल्हारराव होळकरांनी केला. आणि त्यांना राजकारणात तरबेज बनविले.

अहिल्याबाईच्या कालखंडाचे इ.स. 1754 - 1766 पूर्वार्ध आणि इ.स. 1766 ते 1795 उत्तरार्ध असे दोन भाग पडतात. पहिल्या कालखंडात सर्व कारभार मल्हाररावाच्या आज्ञाने चालत होता. परंतु मल्हारराव होळकरांच्या निधनानंतर सर्व सत्ता अहिल्याबाईला सांभाळावी लागली. स्वतःच्या जीवनात कर्मयोग आचरून कन्या, पत्नी, सून, माता आणि कर्तव्य कठोर मुत्सद्दी, प्रजावत्सल राजकारणी व प्रशासक असा महान आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला.

**शोध निबंधाचा उद्देश-**

1. अहिल्याबाई होळकरांच्या पर्यावरण विषयक कार्याचा आढावा घेणे.
2. अहिल्याबाई होळकरांनी राबविलेल्या वीस कलमी योजनेवर प्रकाश टाकने.
3. अहिल्याबाई होळकरांनी पशु-पक्ष्यांसाठी केलेल्या कार्याचा मागवा घेणे.
4. अहिल्याबाईच्या पर्यावरण विषयक कार्यावर प्रकाश टाकने.

**संशोधन पद्धती व संदर्भ साधने-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला असून प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांच्या माध्यमातून हा शोध निबंध पूर्णत्वास आलेला आहे.

**विषयाचे महत्त्व-**

इस 1733 अहिल्याबाई चा विवाह झाल्यानंतर त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. सासरी राज्य कार्य व शासन चालविण्याचे शिक्षण त्यांना मिळू लागले. पती खंडेरावाचा इ. स. 1754 मध्ये कुंभेरीच्या लढाईत मृत्यू झाला.[1] यानंतर त्यांचे वैवाहिक जीवन समाप्त होऊन त्यांच्यावर

प्रशासनाची जबाबदारी आली. अल्पावधीतच इ.स. 1766 मध्ये सासरे मल्हाररावांचे निधन झाले. त्यामुळे अहिल्याबाई वर संपूर्ण होळकर राज्याची जबाबदारी येऊन पडली ती सांभाळणे त्यांना अगत्याचे होते कारण त्यांचा मुलगा अल्पवयीन होता इ.स. 1767 मध्ये अहिल्याबाईच्या मुलाचा मृत्यू झाला. यानंतर मात्र सर्व जबाबदारी अहिल्याबाईलाच सांभाळावी लागली. राज्यकारभार करताना त्यांनी अनेक विधायक कार्य केले.

अहिल्याबाई होळकर यांनी 18 व्या शतकातच पर्यावरणाचे महत्त्व ओळखले होते पर्यावरणाचा योग्य समतोल राखण्यासाठी अहिल्याबाईंनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पर्यावरण संरक्षणासाठी अनेक योजना आखून त्यांची योग्य अंमलबजावणी केली.

**अहिल्याबाईची 20 कलमी योजना-**

अहिल्याबाईला वृक्षांचे महत्त्व कळत होते. रस्त्याच्या दुतर्फा ओसाड पडीक डोंगराळ जमिनीवर लिंब, आंबा, चिंच, पिंपळ, वड, औदुंबर यांची भरपूर झाडे लावली. झाडे लावताना ज्यांना धार्मिक महत्त्व आहे तसेच ज्यांची मुळे खोलवर दूरवर जाऊन जमिनीत नैसर्गिक गारवा टिकवतात त्यांचीच निवड केली. अहिल्याबाईंनी आपल्या राज्यात वृक्ष लागवडीसाठी जनतेला प्रोत्साहन दिले त्यातूनच 20 कलमी योजना पुढे आली त्यांनी असा नियम आखून दिला की "प्रत्येक शेतकऱ्यांनी वीस झाडे लावलीच पाहिजे त्यातील 11 झाडे सरकारी तर 9 झाडे शेतकऱ्यांची राहील संबंधितांनी लागणारे लाकूड त्या झाडापासूनच घ्यावे".[2]

अहिल्याबाईंनी योग्य जागी कुंड, विहिरी, तलाव बांधून पाण्याची सुबत्ता निर्माण केली. नदीचे वाहते पाणी खराब होऊ नये, यासाठी मूळ प्रवाहापासून एक प्रवाह बाजूस वळविला. त्याचा उपयोग स्नान, कपडे धुणे, जनावरांना पाणी आदी कामासाठी केला जात असे. तेच पाणी पुढे शेतीस देण्याची उत्तम सोय केल्याने पाणी प्रदूषण होत नव्हते, परिणामी शेतमाल भरपूर व सकस येत असे. इतकेच नव्हे तर जलसंवर्धन, जलवितरण यास्तव स्वतंत्र खाते निर्माण केले. एक वृक्ष तोडणे म्हणजे एका जीवाची हत्या करणे असा विचार अहिल्याबाईंनी समाजात रूढ केला.[3]

**औषधी वनस्पतीच्या लागवडीस अहिल्याबाई कडून उत्तेजन-**

अहिल्याबाईंनी वृक्षरोपणासारखे उपक्रम राबवून ओसाड माळराने तसेच डोंगराळ जमिनीवर झाडे लावून पर्यावरणाचा समतोल राखला. त्यांनी आपल्या राज्यात ठिकठिकाणी आंब्याची झाडे, आमराई लावण्यास उत्तेजन दिले. तसेच लिंब, चिंच, पिंपळ, वड अशा प्रकारच्या औषधी वनस्पतीची लागवड करावी यावर त्यांनी भर दिला. या झाडांचे संवर्धन करावे म्हणून झाडे लावणाऱ्यांना रोजगार मिळवून दिला. झाडे तोडू नये असे बंधन घातले. आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना प्रेरित करून फळे, फुले यांच्या बागा बनविल्या. याशिवाय इतरही अनेक औषधी वनस्पतीच्या लागवडी व संवर्धनासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे इंदोर राज्यात ठीकठिकाणी छोटी- मोठी अभयारण्य निर्माण झाली.[4]

मानवी जीवनातील वनस्पतीचे औषधी उपयोग जाणून अहिल्याबाईंनी या वनस्पतीच्या संवर्धनातून आयुर्वेद शास्त्रासाठी भरीव कामगिरी केली. नवनवीन औषधी लागवडीसाठी संशोधनासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले. नातू नथोबाचा क्षय रोगामुळे झालेला मृत्यू, जावई यशवंतराव फणसे यांचा कॉलरा मुळे झालेला मृत्यू, सासू गौतमाबाई यांचा दम्याच्या आजाराने झालेला मृत्यू, गुरु व मार्गदर्शक असणारे सासरे सुभेदार मल्हारराव होळकर यांचा कानाचा ठणका लागून झालेला मृत्यू अशा प्रकारे मानवी जीवनाला अनेक आजारांनी, रोगजंतुंनी व्यापल्याने मानवाला आजारापासून मुक्त करण्यासाठी अहिल्याबाईंनी औषधी वनस्पतीच्या लागवडीला महत्त्व दिले.[5]

**अहिल्याबाईंनी पशु-पक्ष्यांसाठी केलेले कार्य-**

अहिल्याबाई केवळ माणसावरच नव्हे तर पशु-पक्ष्यांवरही प्रेम करत होत्या. त्यांनी पशु-पक्षी, स्थलचर, जलचर प्राणी यांना देखील आपल्या पोटच्या लेकराप्रमाणे सांभाळले. त्या पशुपक्षी जनावरांचीही विशेष काळजी घेत. यासंबंधी पुढील प्रमाणे उल्लेख मिळतो.'ती दररोज गरीब लोकांस

अन्न देई व विशेष सणावारांचे दिवशी अत्यंत कनिष्ठ लोकांसही मेजवानी मिळत असे. उष्ण काळात रस्तो रस्ती वाटसरुंना पिण्यासाठी पाणी देण्याकरिता अहिल्याबाईचे नोकर उभे राहत असत. शीतकाळाच्या आरंभी बहुतेक आश्रितांस व पंगू त्याजकरिता खाणे पाठविले जाई, उन्हाळयात महेश्वराजवळचे शेतकरी असे पहात की, जमीन नागरत असता अहिल्याबाईचे नोकर पाण्याची भांडी घेऊन येत व बैलांना पाणी पाजण्यासाठी नांगर थांबवीत.'[6] आपल्या राज्यात सूक्ष्मजीवही उपाशी राहू नये यासाठी अहिल्याबाई सतत दक्ष असे.

अहिल्याबाईंने गाई-गुरांसाठी कुरणे राखून ठेवले यात नवल नाही. पण उभ्या पिकावर येणाऱ्या पाखरांच्या धाडी हाकण्यासाठी होणारा गोफण गुंड्याचा प्रकार पाहून तिचे हळुवार मन दुःखी होत असे. सुगीच्या दिवसात त्या अंतरा- अंतराने पिकल्या शेतांचा एक वाटा पाखरांसाठी राखून ठेवत.[7] यासाठी नेमणूकाही दिल्या.

मानवताधर्म अहिल्याबाईंनी खूप चांगल्या प्रकारे ओळखला होता. अहिल्याबाई होळकरांनी धान्याची अनेक कोठारे व उभे पिक असलेली कित्येक शेत विकत घेत आणि पशु-पक्ष्यांसाठी ती मोकळी सोडून देत. मुंग्यांसाठी साखर व माशांसाठी कणकेच्या गोळया नेहमीच नर्मदेच्या व शिप्रेच्या पाण्यात टाकण्यात येत असे. पशु-पक्ष्यांच्या अशा संरक्षणासाठी अहिल्याबाई पुष्कळ खर्च करीत व या कामासाठी त्यांनी मोठा स्वतंत्र नोकरवर्ग नेमलेला होता.[8] अशाप्रकारे मानवप्राणीच नव्हे तर पशु-पक्षी, जलचर प्राणी यांची काळजी घेऊन अहिल्याबाईंनी जगाला मानवतावादी धर्माचरणाची ओळख करून दिली.

अहिल्याबाईंनी सुरू केलेली ही व्यवस्था आजही चालू आहे.'पशुपक्षी व मुंग्या सारखे लहान कीटक या सर्वांची खाण्यापिण्या संबंधात केलेली व्यवस्था अजूनही श्रेत्रनिहाय चालू आहे. बद्रिकेदारेश्वरच्या रस्त्यावर अंतरा-अंतरावर पांथस्थायी खाण्यापिण्याची व्यवस्था अगदी नियमबद्ध अजूनही चालू आहे.'[9] याशिवाय 'रानावनातून पानपोईची, डोंगर पठारावरून गाईच्या चराईची केलेली व्यवस्था अजूनही अबाधित चालू आहे.'[10] आजही माहेश्वरी येथे नर्मदेतील झालेल्यास वस्त्रे, प्रावरणे मिळत. रानातील पशु, हवेतील पक्षी, नदीतील मासे हे ही तिच्या दयेचा अनुभव पावत.

माशांना कणकेच्या गोळया आणि पशुपक्ष्यांना धान्य होळकर ट्रस्ट तर्फे टाकण्यात येते. अहिल्याबाईंनी सुरू केलेली व्यवस्था अविरत सुरूच आहे. अहिल्याबाईंनी निसर्गातील सर्व जीवजंतूच्या उपयोगी पडण्यासाठी संपूर्ण आयुष्यभर आपला देह झिजविला.

अहिल्यादेवी म्हणजे इतिहासातील सोनेरी पान, अहिल्यादेवी म्हणजे लखलखीत पराक्रमाची, शौर्याची गाथा. अहिल्याबाई म्हणजे मूर्तिमंत दया आणि क्षमा अहिल्याबाई म्हणजे मातीवर अलोट प्रेम करणारी जगमाता अशी अहिल्याबाई पुन्हा होणे नाही अशा कर्मयोगिनी अहिल्याबाईचे 13 ऑगस्ट 1795 रोजी महेश्वर येथे निधन झाले.

**निष्कर्ष-**

मराठ्यांच्या इतिहासात होऊन गेलेल्या स्त्री राज्यकर्त्यांमध्ये इंदोरच्या महाराणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे कार्य आणि कर्तुत्व अतिशय श्रेष्ठ मानले जाते. त्यांच्या प्रजावत्सल कारभारामुळे त्यांची कीर्ती भारतभर पसरली.

जे का रंजले गांजले ! त्यासी म्हणे जो आपुले !!१!!
तो चि साधू ओळखावा ! देव तेथेच जाणावा !!२!!

तुकाराम महाराजांनी वर्णन केल्याप्रमानेच अहिल्याबाई होळकर यांचे आचरण होते. त्यांच्या एकंदर दानधर्मात भवभूतीचा अंकुर होता. त्यांची भूतदया विलक्षण स्वरूपाची होती.

अहिल्याबाई होळकर धान्याची अनेक कोठारे व उभे पिके असलेली कित्येक शेत विकत घेत आणि पशुपक्ष्यांसाठी ती मोकळी सोडून देत, मुंग्यांसाठी साखर व माशांसाठी कणकेच्या गोळया नेहमीच नर्मदेच्या व शिप्रेच्या पाण्यात टाकण्यात येत असत. पशुपक्ष्यांच्या अशा संरक्षणासाठी अहिल्याबाई पुष्कळ खर्च करीत, अहिल्याबाईची ही कल्पना आजच्या अभयारण्यासारखी होती. पर्यावरणाचा समतोल राखला जावा हीच अहिल्याबाईची या मागची भूमिका होती, यावरून त्यांची वत्सलतेची प्रेमळ भावना व भूतदयाची वृत्ती लक्षात येते.

भारतासारख्या कृषी प्रधान देशात संपूर्ण लोकजीवन पावसावर अवलंबून होते त्यामुळे बऱ्याच वेळा दुष्काळ पडून पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होत असे. त्यासाठी अहिल्याबाईंनी संपूर्ण भारतात तलाव, विहिरी व कुंडांची निर्मिती करून लोकांच्या सोयी केल्या. रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावून पर्यावरणाचे रक्षण करणे व वाटसरूंचे उन्हाळयात संरक्षण व्हावे हाच या मागचा उद्देश अहिल्याबाईचा होता.

आज 21व्या शतकात सारेजण पर्यावरणाविषयी चर्चा करीत असताना दिसतात. त्या काळात अहिल्यादेवींनी पर्यावरणाचे महत्त्व ओळखले, रस्त्याच्या दुतर्फा ओसाड, पडीक जमिनीवर, डोंगराळ जमिनीवर लिंब, आंबा, चिंच, वड, औदुंबर यांची भरपूर झाडे लावलीत. प्रत्येक शेतकऱ्यांने वीस झाडे लावलीच पाहिजे अशी अपेक्षा केली त्यातील 11 झाडे सरकारी व 9 झाडे खुद्द शेतकऱ्यांची होती. एवढेच नव्हे तर जलसंवर्धन, जलवितरण यांचे स्वतंत्र खाते निर्माण केले. 'एक वृक्ष तोडणे म्हणजे एका जीवाची हत्या करणे.' असे विचार समाजात त्यांनी रूढ केले.[11] अशा थोर पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या मातेला मी मानाचा मुजरा करतो.

**संदर्भ ग्रंथ सूची-**

1) गोगटे, चिंतामण गंगाधर- बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांचे चरित्र, पृ. 154, प्रकाशक त्र्यंबक हरी आपटे, प्रथमावृत्ती 1908.

2) कठारे, डॉ. अनिल- भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, पृ. 103, एज्युकेशनल पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद, 2013.

3) मोडक, प्रमिला- अहिल्याबाई होळकर जीवन कार्य, पृ. 116, औरंगाबाद, 1980

4) कित्ता, 70.

5) गायकवाड, चंद्रशेखर- पुरोगामी विचारांची जीवनधारा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, पृ. 215, मुंबई, 2006.

6) गोखले, वा. दा.- अहिल्याबाई होळकर चरित्र आणि कार्य, पृ. 37, ठोकळ प्रकाशन, पुणे, 1962.

7) इंगळे, डॉ. राम- अहिल्याबाई होळकर, पृ. 29, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, 1994.

8) शर्मा, हिरालाल- अहिल्याबाई, पृ. 73, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1967

9) ठाकूर, वा. वा. (संपा)- होळकर शाहीचा इतिहास भाग 1 ला पृ. 262- 263, होळकर गव्हर्मेंट प्रेस इंदोर, 1944.

10) कित्ता.

11) कठारे, डॉ. अनिल- भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास, पृ. 103, एज्युकेशनल पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद, 2013.